'सेकंड इनिंग'

# नातीचा लागला लळा

**वझे आजी-आजोबांनी चांगले संस्कार करून एका मुलीचे आयुष्य बदलले. या मुलीला त्यांनी शिक्षणाबरोबरच अन्य गोष्टीही शिकवल्या. त्यांच्या या 'नाती'चे नुकतेच लग्न ठरले अन् त्या आनंदाबरोबरच आजी-आजोबांचे डोळेही पाणावले...**

**अनिल व्यास**, पुणे



मुळशी तालुक्यातील असदे गावी १९९५ मध्ये स्वामी विवेकानंद विद्यालयाची स्थापना करण्यात आली. ही शाळा एका वेगळ्या दिशेने चालवण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षण देणे, त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर भर देणे, भावी जीवनाची आव्हाने पेलणारे शिक्षण देण्याचा प्रयत्न शाळेत केला जातो. त्यांच्या भावी जीवनातही मार्गदर्शन करण्यासाठी शाळेत नेहमी विशेष प्रयत्न होत असतात.

पुणे शहरातील महाविद्यालये- आय.टी. व्यावसायिक-उद्योजक या शाळेशी अनेक ज्येष्ठ नागरिक जोडले गेले आहेत. असेच एक ज्येष्ठ नागरिक जोडपे पद्माकर वझे व विमल वझे या प्रकल्पाशी जोडले गेले आहेत. वझेकाका शाळेत दोन-तीन वर्षे नियमितपणे येत असत व प्रकल्पासाठी वेगवेगळ्या सूचनाही करत असत. एकदा त्यांनी अशी इच्छा व्यक्त केली की, ग्रामीण भागातील एका विद्यार्थिनीचा सांभाळ करण्याची आमची तयारी आहे. उद्देश असा, की आम्हाला आमच्या काही वैयक्तिक

त्यांना सुचवण्यात आले. रोहिणीने अंबाजोगाई येथे अकरावी-बारावीचे शिक्षण घेतले होते. संस्थेनेच तिच्या शिक्षणाची सोय केली होती. ती पुण्यातील सुतारदरा परिसरात राहत असे. वझेकाका प्रभात रस्त्यावर राहतात. दोघांची भेट झाल्यावर कामास सुरवात करण्यात आली. रोज सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत रोहिणीने वझे काकांच्या घरी जाण्याचे ठरले. त्याप्रमाणे सुरवातीस ती बसने ये-जा करू लागली. तिच्यापुढील शिक्षणासाठी काही प्रयत्न सुरू झाले. सुरवातीस संगणकाचे प्राथमिक शिक्षण देण्यासाठी प्रतीकनगर येथे वझे काकांनी तिची सोय केली. त्यातून 'एम.एस.-सी.आय.टी.', 'डीटीपी', 'टॅली' असे वेगवेगळे लहान लहान अभ्यासक्रम पूर्ण होऊ लागले.

तिने पदवी शिक्षण पूर्ण करावे, असा आग्रह वझे काकांनी धरला व त्यासाठी बी.एम.सी.सी.मध्ये प्रयत्न केले. गरवारे महाविद्यालयात सायंकाळच्या महाविद्यालयाचा प्रस्ताव मान्य झाला. त्यांनी स्वतः त्यासाठी सर्व धावपळ केली. तिला हे सर्व करण्यासाठी सुरवातीस एक सायकल घेऊन दिली, तिला बँक

पूरकतेचे निर्माण होऊ लागले.

वझे काकांनी केवळ रोहिणीचाच विचार न करता तिच्या पूर्ण कुटुंबाशी आपले नाते जोडले. स्वतः उठून तिच्या घरी जाऊ लागले. घरच्यांच्या अडीअडचणींत सल्ला देणे, आवश्यक तेथे आर्थिक मदत देणे किंवा मिळवून देणे, अशी सर्व प्रकारे पालक भूमिकेतून त्या कुटुंबास मदत करू लागले. रोहिणीच्या नावे काही पैसे बँकेत मुदतठेव स्वरूपात ठेवले. तिचे वेगळे खाते काढून ते तिला चालवायला शिकवले. तिला दोन चाकी स्वयंचलित वाहन घेऊन दिले व ते वापरावयास लावले. एका अर्थाने त्यांनी ते पूर्ण कुटुंबच स्वीकारले.

रोहिणीही आपल्या आजी-आजोबांची सेवा करण्याच्या भूमिकेतून वेळोवेळी योग्य ती सर्व कामे ती पार पाडत होती. वझे काकांच्या आजारपणात हॉस्पिटलमध्ये फेऱ्या मारण्यापासून वहिनींची औषधांची व सर्व गोष्टींची काळजी ती घेत असे. तिच्या एकूण व्यक्तिमत्त्वात त्यामुळे चांगलाच फरक पडत गेला. वझे काकांच्या परिवारातील अन्य व्यक्ती-नातेवाईक मित्रमंडळींशीही रोहिणीची चांगली ओळख झाली व त्यातून एक वेगळे विश्व तिला अनुभवता आले. गेल्यावर्षी ती पदवी परीक्षा उत्तीर्ण होणार व तिचे लग्न करावे लागणार हे लक्षात आल्यावर वझे काकांनी अशीच एखादी दुसरी मुलगी मिळेल का, असे विचारले.

संस्थेने जिजा गोरे नावाची निवे गावच्या माजी विद्यार्थ्याच्या बहिणीची शिफारस केली. तिला दहावीनंतर एस.एन.डी.टी.त अकरावीला प्रवेश मिळवून दिला होता. तिचा मुक्कामच त्यांच्या घरी ठरवण्यात आला. जिजाने पुणे शहर बघितलेच नव्हते. तिला दूरचित्रवाणी, फ्रीज, पोस्टाची पेटी अशा सर्वच गोष्टी नवीन होत्या. वझे काका तिला या सर्व गोष्टींची ओळख करून देत असतात. लहान-सहान खरेदीसाठी बँक-पोस्ट, वीज बिल, फोन बिल भरण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण ते स्वतः तिला देत आहेत. या वर्षी तिच्या बारावीच्या प्रवेशासाठी स्वतः एस.एन.डी.टी.त त्यांनी तीन तास खर्च केले व आता दुसरी मुलगी त्यांच्याकडे संस्कार घेऊन तयार होऊ लागली आहे.

रोहिणीचे मे महिन्यात लग्न ठरले. पाच वर्षांच्या सहवासानंतर आपली नात आता सासरी जाणार म्हणून आजोबा-आजींनी तिला केळवण केले. घरच्या सर्वांना बोलावले. त्या वेळी रोहिणीचे वडील म्हणाले, की आम्ही २०-२२ वर्षांत तिच्यावर जे संस्कार करू शकलो नाही, ते तुम्ही पाच वर्षांत केले व आता आम्हाला तिच्या भावी जीवनाविषयी तिळमात्र शंका उरली नाही. ती आपला संसार नक्कीच चांगला करू शकेल.

लग्नाच्या आधी वझे काकांची भेट घेतली. त्या वेळी रोहिणीचे लग्न झाल्यावर तिची नियमित भेट होणार नाही या कल्पनेने दोघेही